# <u>शरद पवार इन्स्पायर फेलोशिप इन एज्युकेशन २०२५-२६</u>

## *<u>बाल शिक्षण</u>*

शिक्षण उद्यासाठी असतेसुजाण उद्याचे ., सतर्क, सर्जनशील, कर्तबगार व सुसंस्कृत नागरिक घडविणे खऱ्या, उचित व उत्तम शिक्षणाकडून अपेक्षित असतेकसे शिकावे ., शिकण्याचा आनंद कसा घ्यावा आजन्म आणि द्यावा- उद्याची जे शिकता-शिकता .शिक्षण खरे ते शिकविते हे राहावे कसे शिकत करते सज्ज पेलायला आव्हाने, उद्याच्या संधींचे सोने करायला शिकवते ते खरे शिक्षण .याच शिक्षण क्षेत्रांत नवीन प्रयोग, संशोधन करणाऱ्या महाराष्ट्रातील तरुणांना संशोधनाची संधी मिळावी त्यांच्यातील नव्या कल्पनाना वाव मिळावा आणि प्रयोगांना चालना मिळावी, तसेच शैक्षणिक, सामाजिक प्रश्नांना उत्तर शोधण्यासाठी उमेद मिळावी, या उद्देशाने यशवंतराव चव्हाण सेंटरतर्फे शरद पवार इन्स्पायर फेलोशिप इन एज्युकेशन देण्यात येते. ही फेलोशिप शिक्षकाना 20 प्राथमिक आणि 10 माध्यमिक शिक्षकाना दिली जाते. शिक्षण क्षेत्रात काम करणाऱ्या तरुणांना सक्षम बनवणे आणि त्यांच्या संशोधनात्मक कामाला चालना देणे, हे मुख्य उद्दिष्ट या फेलोशिपचे आहे आहे.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० मध्ये अनेक शिफारशी केल्या आहेत आणि कार्यक्रमही सुचवले आहेत. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०, या धोरणाच्या अंमलबजावणीसाठी तयार केलेला कृती कार्यक्रम (SARTHAQ भाग १ आणि २), तसेच निपुण भारत अभियान. तसेच भारतीय संविधानाच्या तरतुदींच्या अनुषंगाने मूल्यशिक्षण, स्वयंअध्ययन आणि सहअध्ययन यांचा अध्ययन-अध्यापन आणि मूल्यमापन प्रक्रियेत प्रभावी वापर, विविध विषयांचा परस्परांशी आणि कला व खेळ यांच्याशी समन्वय, बहुवर्ग अध्यापन, वाचताना वाचनाचा वेग आणि आकलन वाढवण्यासाठी घेतलेले उपक्रम, पालक आणि स्थानिक समाज यांचा शालेय कामकाजात आणि अध्ययन-अध्यापन प्रक्रियेत सहभाग, शाळेची इमारत आणि परिसर यांचा शैक्षणिक साधन म्हणून वापर, अध्ययन-अध्यापन प्रक्रियेत डिजिटल लर्निंगचा प्रभावी वापर, असे अनेक उपक्रम आयोजित करता येतील. ही

केवळ उदाहरणे म्हणून दिली आहेत, तरी परंतु आपण आपल्या विद्यार्थ्यांच्या गरजा लक्षात घेऊन, कोणते उपक्रम निवडावे याचे संपुर्ण स्वातंत्र्य शिक्षकांना असेल.

सध्या महाराष्ट्रातील प्राथमिक व माध्यमिक शिक्षकांना यशवंतराव चव्हाण सेंटरतर्फे 'शरद पवार इन्स्पायर फेलोशिप इन एज्युकेशन' दिली जाते. नवोपक्रम किंवा संशोधन करण्यासाठी काही रोख रक्कम व मार्गदर्शन असे या फेलोशिपचे स्वरूप असते. या फेलोशिपबद्दलची अधिक माहिती आपण पुढील लिंक वर पाहू शकता. https://www.sharadpawarfellowship.com/fellowships/education-fellowship

या वर्षी प्रथमच शालापूर्व स्तरावर बालशिक्षणासाठी काम करणाऱ्या व्यक्तींसाठी या फेलोशिप मधील 10 जागा उपलब्ध करून देण्यात येणार आहे हेतू असा मिळावे प्रोत्साहन संशोधनाला कृती स्तरावर शालापूर्व . .आहे निर्णयामागे या

या अंतर्गत अंगणवाडी सेविका, पर्यवेक्षिका, CDPO, अनुदानित शाळांतील बालशाळांमध्ये कार्यरत शिक्षक व मुख्याध्यापक, तसेच बालशिक्षणात काम करणाऱ्या अशासकीय संस्थांतील कार्यकर्ते हे फेलोशिपसाठी पात्र असतील. त्यांना बालशिक्षण क्षेत्रात कृती संशोधन करण्याची संधी दिली जाईल.

---

## ***बालवयातील शिक्षणाचे महत्त्व***

बाल्यावस्था—विशेषतः जन्म ते ६ वयोगट—हा मेंदूच्या झपाट्याने होणाऱ्या विकासाचा कालखंड असतो. वयाच्या सहाव्या वर्षापर्यंत मानवी मेंदूचा सुमारे ९०% विकास पूर्ण होतो.

या वयात मिळणारे अनुभव, शैक्षणिक वातावरण, खेळ, अन्वेषण आणि कृतीच्या संधी मुलांच्या एकूण शैक्षणिक व व्यक्तिमत्त्व विकासावर खोल परिणाम करत असतात.

## *भारतातील बालशिक्षणाचा प्रवास*

गिजुभाई बधेका यांनी बालशिक्षणाच्या कामाला स्वातंत्र्यपूर्व काळात सुरूवात केली व ताराबाई मोडक, अनुताई वाघ यांनी हे काम पुढे नेले. महाराष्ट्रात ताराबाई व अनुताई यांनी बालशिक्षणातील भरीव कामाची पायाभरणी केली. १९७५ मध्ये सुरू झालेल्या ICDS (Integrated Child Development Scheme) अंतर्गत अंगणवाड्यांद्वारे बालशिक्षणाच्या सेवा दिल्या जाऊ लागल्या. मात्र, ICDS मधील इतर आरोग्य व पोषण सेवांबरोबर शिक्षण ही एक सेवाच ठरली. त्यामुळे शिक्षणाला अपेक्षित प्राधान्य मिळाले नाही.

महाराष्ट्रात 'आकार' अभ्यासक्रमाच्या माध्यमातून अंगणवाड्यांतील शिक्षणासाठी एक चौकट निर्माण करण्यात आली. त्यामुळे अनेक अंगणवाड्यांमध्ये बालशिक्षणाचे अधिक चांगले काम होऊ लागले आणि सेविकांना विशेष प्रशिक्षणही मिळाले. तरीही, बालशिक्षण औपचारिक शिक्षणव्यवस्थेच्या कक्षेबाहेरच राहिले.

---

## *शैक्षणिक धोरणानुसार बदल*

२०२० साली जाहीर झालेल्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाने (NEP 2020) बालशिक्षणाला प्रथमच औपचारिक शिक्षणव्यवस्थेचा भाग म्हणून मान्यता दिली आहे. वय वर्षे ३ ते ८ या काळाला शिक्षणातील *Foundational Stage* म्हणण्यात आले आहे, त्यासाठी विशेष अभ्यासक्रम आराखडा तयार करण्यात आला आहे. त्यानुसार अंगणवाड्या वर्ष शैक्षणिक बालवाड्या , -२०२५२६ पासून प्राथमिक शाळांशी जोडल्या आहेत.

या अनुषंगाने महाराष्ट्रातील अंगणवाडी व इतर संस्थांमध्ये बालशिक्षणाच्या संदर्भात संशोधन व कृती अभ्यास होणे अत्यावश्यक आहे. आपण SPIF in Education ही प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षकाना गुणवत्तेनूसार देत आहोत.

बदललेल्या नवीन शैक्षणिक धोरणानुसार पायाभूत शिक्षणामध्ये महत्वाची भूमिका बजवणाऱ्या अंगणवाडी सेविकाना SPIF in Education देण्यात येईल, यामुळे अंगणवाडी सेविकाना प्रेरणा मिळून त्यांचे सक्षमिकरण होईल विश्वास याचा ,वाटतो. त्यामुळे या वर्षीपासून शरद पवार इन्स्पायर फेलोशिपमध्ये बालशिक्षण क्षेत्रासाठी 10 जागा राखीव ठेवण्यात आल्या आहेत.

---

## *फेलोशिपचे स्वरूप व साधारण वेळापत्रक*

### फेलोशिपचे तपशील (Eligibility, Structure and Design)

**फेलोशिपसाठी वयोमर्यादा:** वय ४५ वर्षे किंवा त्यापेक्षा कमी असलेल्या अंगणवाडी, बालवाडी सेविका पर्यवेक्षिका, CDPO, बालशाळांमध्ये कार्यरत शिक्षक व मुख्याध्यापक, तसेच बालशिक्षणात काम करणाऱ्या अशासकीय संस्थांतील कार्यकर्ते

**फेलोशिप कालावधी :**सप्टेंबर २०२५ ते मे २०२६

**फेलोशिपसाठी पात्रता :**

महाराष्ट्रभरात बालशिक्षणात काम करणारी लोक, Under privileged समुदायासाठी काम करणाऱ्या लोकांना ही फेलोशिप देण्यात येईल.

- अंगणवाडी सेविका
- अंगणवाडी मदतनीस
- अगंणावाडी पर्यवेक्षिका
- बालविकास प्रकल्प अधिकारी (CDPO)
- बालशाळा शिक्षिका/शिक्षक
- बालशाळा प्रमुख
- अशासकिय संस्था कार्यकर्ता/कार्यकर्ती

खाजगी अंगणवाड्यांमध्ये काम करणाऱ्यांना ही फेलोशिप देता येणार नाही

**फेलोजची संख्या :** प्रती वर्षी १०
**अर्जदारांचे कार्यक्षेत्र:** महाराष्ट्रातील अंगणवाडी बालवाडी आणि ,बालशिक्षणात काम करणाऱ्या स्वयंसेवी संस्था
**फेलोशिपची रोख रक्कम:**
निवड झालेल्या प्रत्येक अंगणवाडी, बालवाडी सेविकेस वार्षिक रु. ६०,००० /- (रुपये साठ हजार फक्त).
यापैकी रुपये ४०,०००/- फेलोशिपमधील उपक्रमांसाठी लागणारी साधने, संभाव्य प्रवास, इ. साठी लागणारा खर्च सदर रक्कमेतून करावयाचा आहे.
रुपये २०,०००/- हे कार्यशाळा आणि मेंटरिंग साठी खर्च केले जातील.

## *निवड प्रक्रिया (Selection Process)*

**अर्ज प्रक्रिया:** इच्छुकांनी [www.sharadpawarfellowship.com](http://www.sharadpawarfellowship.com) संकेतस्थळावर ऑनलाईन अर्ज करणे अपेक्षित आहे .

**निवड प्रक्रिया :**
तज्ज्ञ समितीकडून अर्जांची छाननी पूर्ण करण्यात येईल व पात्रतेचे निकष अधिक गुणवत्तेने पूर्ण करणाऱ्या मोजक्याच अर्जदारांची तज्ज्ञांतर्फे (आवश्यकतेनुसार शाळाभेटीसह) प्रत्यक्ष / दूरस्थ मुलाखतींसाठी निवड करण्यात येईल.
मुलाखतीतील गुणवत्तेच्या मूल्यमापनानुसार फेलोशिपसाठी वरील प्रमाणे १० जणांची निवड करण्यात येईल.

निवड झालेल्या फेलोची, फेलोशिप स्वीकारण्याविषयीची लेखी अनुमती घेण्यात येईल. आवश्यकतेनुसार त्यांच्या शाळेच्या मुख्याध्यापकांचीही सहसंमती घेण्यात येईल.

# अर्ज प्रक्रिया

१. इच्छुक शिक्षकांनी दिनांक १५ ऑगस्ट २०२५ अखेर https://apply.sharadpawarfellowship.com या संकेत स्थळावर ऑनलाईन अर्ज करणे अपेक्षित आहे.

२. अर्ज करताना भरावयाची माहिती:

नाव :
मोबाईल नंबर :
इ मेल (असल्यास) :
जन्मतारीख:
पत्ता:
जिल्हा :

**शैक्षणिक पात्रता:**

- पदव्युत्तर पदवी
- पदवी
- पदविका
- १२ वी
- १० वी
- माध्यमिकपूर्व (८वी किंवा ९वी पर्यंत)
- इतर

**पद :**

- अंगणवाडी सेविका
- अंगणवाडी मदतनीस
- अगंणावाडी पर्यवेक्षिका
- बालविकास प्रकल्प अधिकारी (CDPO)
- बालशाळा शिक्षिका/शिक्षक
- बालशाळा प्रमुख
- अशासकिय संस्था कार्यकर्ता/कार्यकर्ती
- इतर

***कामाचे ठिकाण :***

- अंगणवाडी
- अंगणवाडी बीट

- एकात्मिक बालविकास योजना प्रकल्प (ICDS)
- बालशाळा
- अशासकिय संस्था (NGO)
- इतर

*या फेलोशिप दरम्यान करण्याच्या कामासाठी आवश्यक वेळ देण्याची तुमची तयारी आहे का? (८ तास प्रति आठवडा)*

- हो
- नाही

*या फेलोशिप दरम्यान कार्यशाळांना उपस्थित राहणे अनिवार्य आहे. यासाठी वेळ देण्याची व प्रवास करण्याची तुमची तयारी आहे का?*
(सप्टेंबर २५ ते एप्रिल २६ या कालावधीत एकूण ४ कार्यशाळा मिळून १० दिवस. तपशीलासाठी टाइमलाईन बघा)

- हो
- नाही

*तुम्ही फेलोशिपमध्ये करायच्या अभ्यासाचा कोणता विषय निवडला आहे त्या बद्दल थोडक्यात लिहा. (७५ ते १०० शब्द) **
*तुम्ही निवडलेला विषय खालीलपैकी कोणत्या क्षेत्रांतर्गत येतो ते निवडा.*

- मुलं
- वर्गांतर्गत प्रक्रिया
- मूल्यमापन
- साहित्य
- वातावरण
- पालक/समाज
- शिक्षण यंत्रणा
- प्रशिक्षण
- इतर

*तुम्ही हा विषय का निवडला आहे या बद्दल थोडक्यात लिहा. (१०० ते १५० शब्द)**

*<u>शिक्षण पाठ्यावृत्तीच्या अर्ज प्रक्रियेचे वेळापत्रक</u>*

| | | |
|---|---|---|
| १. | **अर्ज करण्याची अंतिम मुदत** | १५ ऑगस्ट २०२५ |
| २. | **अर्जाची छाननी आणि निवड प्रक्रिया** | १६ ते ३० ऑगस्ट २०२५ |
| ३. | **निवड झालेल्या शिक्षकांची यादी जाहीर करणे** | ५ सप्टेंबर २०२५ |
| ४. | **निवड झालेल्या फेलोंची ऑनलाईन बैठक** | ८ सप्टेंबर २०२५ |
| ५. | **प्रथम कार्यशाळा** | १९, २०, २१ सप्टेंबर २०२५ (बारामती) जोडून प्रगत शिक्षण संस्थेच्या शाळेत भेट |
| ६. | **द्वितीय कार्यशाळा** | १, २ नोव्हेंबर २०२५ (खंडाळा) |
| ७. | **फेलोशिप प्रदान सोहळा** | १४ डिसेंबर २०२५ (यशवंतराव चव्हाण सेंटर, मुंबई) |
| ८. | **तृतीय कार्यशाळा** | ७, ८ फेब्रुवारी २०२६ (पुणे) |
| ९. | **कामाचे प्रदर्शन** | ४, ५, ६ एप्रिल २०२६ (नाशिक) जोडून सिन्नर प्रकल्पाला भेट |

## FAQs:

- ही फेलोशिप कोणासाठी आहे?
  *ही फेलोशिप बालशिक्षणात काम करणाऱ्यांसाठी आहे. यामुळे या फेलोशिपसाठी अंगणवाडी सेविका, अंगणवाडी पर्यवेक्षिका (सुपरवायझर), CDPO, बालवाडी शिक्षिका, बालवाडी विभाग प्रमुख व अशासकीय संस्थांतील बालशिक्षणात काम करणारे व्यक्ति या फेलोशिपचा लाभ घेऊ शकतात.*
- या फेलोशिपसाठी कोणी अर्ज करावा?
  *बालशिक्षणात काम करत असणाऱ्या व आपल्या कामला संशोधनाची जोड देऊन नवीन काही करू पाहणाऱ्यांनी या फेलोशिपसाठी अर्ज करावा.*
- माझे वय ५० वर्षे आहे. मी ही फेलोशिप करू शकते का?
  *या फेलोशिपसाठीची वयोमर्यादा ४५ वर्षे आहे. असे असले तरी इच्छुक व पात्र उमेदवारांना त्यांच्या काम करण्याची तयारी व अनुभवाच्या आधारावर संधी मिळू शकेल. या बद्दलचा शेवटचा निर्णय निवड समितीचा असेल.*
- फेलोशिपची निवड प्रक्रिया कशी असेल?
  *इच्छुक उमेदवारांनी सर्व प्रथम फेलोशिपचा ऑनलाईन फॉर्म भरायचा आहे. आलेल्या फॉर्म्स मधून काही उमेदवारांची निवड करून त्यातून निवडल्या गेलेल्या उमेदवारांची फोन द्वारे किंवा ऑनलाईन मुलाखत घेण्यात येईल. त्या नंतर उमेदवारांची अंतिम निवड करण्यात येईल.*
- फेलोशिपसाठी निवडीचे निकष काय आहेत?
  फेलोशिपसाठी निवडीचे निकष खालिलप्रमाणे असतील.
  - उमेदवाराने निवडलेला प्रकल्प संशोधन करण्या योग्य आहे का? हा प्रकल्प बालशिक्षणासाठी उपयोगी ठरणार आहे का व याचा मुलांना लाभ मिळणार आहे का?
  - उमेदवाराचा या क्षेत्रातील कामाचा अनुभव
  - उमेदवाराची वेळ देण्याची व काम करण्याची तयारी
- अर्ज करण्याची अंतीम तारिख काय आहे?
  —-------------------------------------
- या फेलोशिपसाठी मला किती वेळ द्यावा लागेल?
  *ही फेलोशिप एका वर्षासाठी असेल. असे असले तरी बहुतांश काम तुम्ही आपल्या ठिकाणी राहून करणार आहात. परंतू वर्षभरात ४ कार्यशाळा घेण्यात येतील. या कार्यशाळांसाठी १ दिवसांचा वेळ तुम्हाला द्यावा लागेल. या खेरीज आपल्या ठिकाणी राहून अहवाल लेखनासाठी साधारण २ ते ३ दिवसांचा वेळ लागण्याची शक्यता आहे. बाकी फेलोशिपचे काम हे आपल्या नियमीत कामाचाच भाग असेल व त्यासाठी वेगळा वेळ द्यावा लागणार नाही.*
- मी गडचिरोली जिल्ह्यात राहते तर मी ही फेलोशिप करू शकेल का?
  *हो. महाराष्ट्रातील कोणत्याही भागात काम करणाऱ्या व्यक्तिंना ही फेलोशिप करता येईल. विविध भागांतून उमेदवारांनी या फेलोशिपसाठी नक्की अर्ज करावा.*
- या फेलोशिप दरम्यान मला प्रवास करावा लागेल का? करावा लागणार असेल तर किती?
  *हो. याफेलोशिप दरम्यान होणाऱ्या कार्यशाळांमध्ये सहभागी होण्यासाठी तुम्हाला प्रवास करावा लागेल. अशा ४ कार्यशाळांना उपस्थित राहणे गरजेचे असेल.*
- या फेलोशिपसाठी कराव्या लागणाऱ्या प्रवासाचा खर्च मला मिळेल का?
  *हो. या फेलोशिपमध्ये होणाऱ्या कार्यशाळांना उपस्थित राहण्यासाठी होणाऱ्या प्रवासाचा खर्च तुम्हाला देण्यात येईल. हा प्रवास सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेतून (पब्लिक ट्रांस्पोर्ट) करणे अपेक्षीत असेल. उदा. एसटी बस, रेल्वे स्लिपर क्लास. खाजगी वाहनाने केलेल्या प्रवासाचा खर्च देण्यात येणार नाही.*
- या फेलोशिप दरम्यान मला मार्गदर्शन मिळेल का?
  *हो. या फेलोशिपमध्ये तुम्ही निवडलेल्या संशोधन प्रकल्पावर काम करण्यासाठी तुम्हाला कार्यशाळांच्या माध्यमातून मार्गदर्शन करण्यात येईल. या शिवाय प्रत्येक फेलोंना मेंटर देण्यात येतील जे त्यांना फिल्डवर काम करत असताना मार्गदर्शन करतील.*
- ही फेलोशिप कुठे असेल?

*या फेलोशिपचे काम तुम्ही आपापल्या नियमीत कामाच्या ठिकाणीच करणे अपेक्षीत आहे. त्यामुळे तुमचे नियमीत कामाचे ठिकाण हेच फेलोशिपचे ठिकाण असेल. या फेलोशिप दरम्यान होणाऱ्या कार्यशाळांसाठी फक्त प्रवास करणे अपेक्षीत असेल. या कार्यशाळा नाशिक, पुणे या ठिकाणी होतील.*

- या फेलोशिप साठी अर्ज कसा भरू?
  *या फेलोशिप साठी ऑनलाईन अर्ज भरणे अपेक्षित आहे. हा अर्ज तुम्हाला* https://www.sharadpawarfellowship.com/ *या वेबसाईट वर मिळेल.*
- मला इंग्रजी येत नाही तर मी ही फेलोशिप करू शकेल का?
  *नक्कीच. या फेलोशिपसाठी इंग्रजी भाषा येण्याची अट नाही. तुम्ही काम तुमच्या स्थानिक भाषेत केले तरी चालणार आहे. परंतू तुम्हाला मराठी भाषा येणे गरजेचे असेल.*
- माझ्याकडे लॅपटॉप किंवा कॉंप्युटर नाही, मला टायपिंगही येत नाही तर मी ही फेलोशिप पूर्ण करू शकेल का?
  *हो. या फेलोशिपसाठी तुमच्याकडे लॅपटॉप किंवा कॉंप्युटर असण्याची गरज नाही.*
- मी अंगणवाडी सेवीका असल्याने मला इतरही बरीच कामे असतात अशात मी स्वत:चे काम करत ही फेलोशीप करू शकते का?
  *हो. ही फेलोशिप तुमच्या कामाचाच भाग असणार आहे त्यामुळे तुम्ही ही फेलोशिप पूर्ण करू शकता. परंतू या फेलोशिपचा भाग म्हणून होणाऱ्या कार्यशाळांमध्ये सहभागी होण्यासाठी किमान ९ दिवस तुम्हाला काढावे लागतील.*
- मी खाजगी कंपनीत काम करतो. मला या फेलोशीपसाठी अर्ज करता येईल का?
  *नाही. ही फेलोशिप अंगणवाडीत व बालशिक्षणात काम करणाऱ्या व्यक्तिंसाठी असल्याणे खाजगी कंपनीत काम करणाऱ्यांना या फेलोशिपसाठी अर्ज करता येणार नाही.*
- मी बीएड केले आहे. सध्या कोणत्याही संस्थेबरोबर किंवा शाळेबरोबर वैगेरे काम करत नाही. मी या फेलोशिपसाठी अर्ज करू शकतो का?
  *नाही. ही फेलोशिप सध्या बालशिक्षणात काम करत असणाऱ्या व्यक्तिंसाठीच आहे.*
- फेलोशिपच्या कामानिमीत्त दुसऱ्या शहरात जावे लागल्यास तेथील निवासाची सोय करण्यात येईल का?
  *या फेलोशिप दरम्यान केवळ कार्यशाळांसाठी इतर ठिकाणी जावे लागू शकते. या कार्यशाळांच्या वेळी निवासाची व भोजनाची सोय करण्यात येईल.*
- फेलोशिप करीता निवड झाल्यावर कार्यशाळा असतील का ?
  *या फेलोशिपकरीता निवड झाल्यास फेलोंना ४ कार्यशाळा करणे बंधनकारक असेल. या कार्यशाळांतून फेलोंचे संशोधनाचे काम पुढे घेऊन जाण्याकरीता तज्ज्ञांद्वारे मार्गदर्शन करण्यात येईल.*
- कार्यशाळेसाठी उपस्थित राहण बंधनकारक असेल का ?
  *हो. या कार्यशाळांसाठी उपस्थित राहणे बंधनकारक असेल.*
- फेलोशिपसाठी विषय कसा निवडावा? याबद्दल काही मार्गदर्शन मिळेल का?
  *हो. फेलोशिपसाठी निवडायच्या विषयांचे काही पर्याय फेलोशिपसाठी करायच्या अर्जात दिलेले आहेत. या खेरिज इतर विषय निवडायचा असल्यास अर्जात दिलेले विषय उदाहरण म्हणून बघून त्याआधारे विषय निवडता येतील. तुम्ही निवडलेला विषय पुढे घेऊन जाण्यासाठी फेलोशिपमध्ये मार्गदर्शन करण्यात येईल.*
- फेलोशिपचा कालखंड किती असेल ?
  *फेलोशिपचा कालखंड वर्षभराचा असेल. ही फेलोशिप जूलै/ऑगस्ट मध्ये सुरू होऊन एप्रिल/मे मध्ये संपेल.*
- फेलोशिप करीता किती रक्कम मिळेल ? आणि कशी मिळेल ?
  *या फेलोशिपमध्ये फेलोंना ६०,००० रूपये मिळतील. ही रक्कम फेलोंच्या प्रगतीनुसार ३ टप्प्यांत मिळेल. हे टप्पे साधारणपणे सप्टेंबर, डिसेंबर व मार्च असे असतील. परंतू हे फेलोंच्या प्रगतीवर देखील अवलंबून असेल.*
- फेलोशिपचा कार्यक्रम मुंबईमध्ये असल्यास, यावे लागेल काय?
  *हो. फेलोशिप प्रदान कार्यक्रम मुंबईमध्ये आयोजित करण्यात येत असतो. त्यासाठी फेलोंनी उपस्थित राहणे आवश्यक असते. या प्रवासाचा खर्च फेलोंनी स्वत: करावयाचा असतो.*
- एका वर्षात ही फेलोशिप किती जणांना देण्यात येते?
  *बालशिक्षणामध्ये काम करणाऱ्या १० लोकांना ही फेलोशिप देण्यात येते.*